




Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६३३ . वा | बुधवार | दि. २० डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये







# जिजाऊ बँकेच्या मुख्यालयासमोर आत्मदहनाचा इशारा...


## तक्रारकर्ते संजय भार्गव यांचा इशारा, कोठाळेंच्या भ्रष्टाचाराचा आणखी एक नमुना

जनसंचलन/ बुलढाणा

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक अमरावती या संस्थेत होत असलेल्या विविध प्रकारच्या गैव्यवहारांनी आता कळस गाठल्याचे दिसून येत आहे. बँकेतील एका खातेदाराच्या खात्यातून परस्पर ३९ लाख रुपये दुसऱ्या खात्यात वळते केल्याबद्दल आता संबंधित खातेदाराने चक्क बँकेच्या मुख्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. या घटनेमुळे अविनाश अंबादास कोठाळे यांच्या नालायक प्रशासनाची पुन्हा एकदा लक्तरे वेशीवर टांगल्या गेली आहेत. दरम्यान, या इशाऱ्यामुळे जिजाऊ बँक प्रशासनात चांगलीच खळबळ उडाल्याचे पहायला मिळते आहे. यासंदर्भात तक्रारकर्ते संजय पृथ्वीनाथ भार्गव यांनी आष्टी (जिल्हा वर्धा) च्या पोलिस स्टेशन निरीक्षकांना एक तक्रार अर्ज दिलेला आहे. या तक्रारीत भार्गव यांनी म्हटले आहे की, जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लिमिटेड अमरावतीचे अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे, तसेच बँकेचे एक संचालक विलास संतोषराव राऊत यांनी धुर्तपणे संगनमत करून माझ्या खात्यातून ३९ लाख रुपयांची रक्कम परस्पर काढून घेतली. यासंदर्भात कोठाळे व राऊत यांना वारंवार विचारणा करण्यात आली, परंतु त्यांनी प्रत्येक वेळी उडवाउडवीची उत्तरे दिली. दि. २४

**जिजाऊ कमर्शियल अमरावती बँकेचा प्रताप भाग-२०४**

सप्टेंबर रोजी जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेची अमरावती येथे आमसभा पार पडली. या आमसभेत माझी मुलगी वैभवी संजय भार्गव हिने भर सभेत कोठाळे यांना परस्पर ३९ लाख रुपये काढून का घेतले, याबाबतचा खडसावून जाब विचारला. त्या वेळी अविनाश कोठाळे व विलास राऊत हे दोघेही पुरते गोंधळून गेले होते. या प्रकरणी आता कोठाळे व राऊत यांचे पितळ उघडे पडल्यामुळे हे प्रकरण दाबण्यासाठी ते माझ्यावर वेगवेगळ्या मार्गाने दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. कोठाळे व राऊत हे अवैधरित्या माझ्या घराचा लिलाव करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असून, ते प्रशासनाकडे माझ्याविरोधात खोट्या-नाट्या तक्रारी करीत आहेत. काहीही करून त्यांना माझे घर निलाम करायचे असल्याचे दिसून येत आहे. कोठाळे व राऊत हे माझ्यावर सातत्याने दबाव आणून मला मानसिक त्रास देत असल्याचा आरोपही भार्गव यांनी या पत्राद्वारे केला आहे. त्यामुळे कोठाळे व राऊत यांचा हा मानसिक छळ मला सहन होत नसून, हा त्रास कमी न झाल्यास पुढील दहा दिवसात जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक अमरावतीच्या मुख्य कार्यालयासमोर आत्मदहन करेल, असा इशारा संजय भार्गव यांनी या तक्रारीत दिला आहे. भार्गव यांच्या या प्रकरणातून आणखी एक बाब सिद्ध होते की, कोठाळे हे बँकेचा कारभार करताना किती नालायकपणे आणि निष्ठूरपणे वागू शकतात. कोठाळे यांना कुठलीही साधनशूचिता आता राहिलेली नाही. कोठाळे यांनी नालायकपणाचा अगदी कळस गाठला आहे. आपल्या मर्जीत नसलेल्या लोकांच्या खात्यांमध्ये हेरफेर करायचा, त्यांना नाहक त्रास द्यायचा,त्यांचा मानसिक छळ करायचा, त्यांच्या संपत्ती जप्त करायच्या, असले घाणेरडे प्रकार कोठाळे हे सातत्याने करीत असतात. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने कोठाळे व त्यांच्या काही नालायक संचालकांची ही कृष्णकृत्ये सातत्याने बाहेर काढत राहणार आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने सातत्याने जिजाऊ बँकेतील घोटाळ्यांवर प्रकाश टाकण्याचे काम केलेले आहे आणि यापुढील काळात देखील करीत राहणार आहे. याच पाठपुराव्यामुळे आता जिजाऊ बँकेतील भ्रष्टाचाराचा मुद्दा हा थेट विधिमंडळात




जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँकेची 24 सप्टें. 2023 ला झालेल्या आमसभेत वैभवी संजय भार्गव यांनी त्यांच्या खात्यातून परस्पर 39 लाख रुपये वळती केल्याने प्रश्न उपस्थित करून जिजाऊ बँक अनरावती 'कोठाळे' यांना घाम फोडला होता

पोहोचला आहे आणि खुद्द सहकार मंत्र्यांनी बँकेच्या गैरव्यवहारांची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे आता कोठाळे व त्यांच्या काही नालायक संचालकांच्या भ्रष्टाचाराचा पुरता भंडाफोड झाला असून, लवकरच त्यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित आहे. त्या दृष्टीने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने प्रयत्न करीत राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...






# सीसी कॅमेऱ्याच्या आधारे चोरटा अडकला जाळ्यात...

## दुचाकी जप्त : खामगाव शहर पोलिस ठाण्याच्या डीबी पथकाची कारवाई

जनसंचलन/ खामगाव

सिव्हिल लाइन भागातून महागडी दुचाकी चोरी करणारा चोरटा सीसी कॅमेऱ्यात कैद झाल्याने पोलिसांनी त्याला काही तासातच पकडले. त्याच्याकडून सोमवारी दुचाकी जप्त केली आहे. सिव्हिल लाइन भागातील रहिवासी कृष्णा गजानन सोनी (२५) यांनी त्यांची दुचाकी शनिवारी रात्री घरासमोर उभी केली होती.ती रविवारी सकाळी आढळून आली नाही. त्यामुळे त्यांनी महागडी दुचाकीची (क्र. एमएच १२ ३४३३) चोरी गेल्याची तक्रार शहर ठाण्यात दिली होती. त्यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल करत तपास सुरू केला. पोलिसांनी परिसरातील सीसी कॅमे-याची पाहणी केली असता एक चोरटा दुचाकी चोरी करताना दिसून आला. या आधारे पोलिसांनी जलद गतीने तपास चक्र फिरवत दुचाकी चोरी करणारा शिवशंकर ऊर्फ शिवा रामधन साठे (१९, रा. मोरगाव, दिग्रस ह.मु. भिसे) प्लॉट यास राहत्या घरून अटक केली. यावेळी त्याच्या ताब्यातून



पोलिसांनी चोरीची दुचाकी जप्त केली. ही कारवाई डीबी पथकाचे एएसआय बळीराम वरखेडे, पोलिस कॉन्स्टेबल रवींद्र कन्नर, पोलिस हेड कॉन्स्टेबल प्रदीप मोठे यांनी केली. पुढील तपास एएसआय बळीराम वरखेडे हे करीत आहेत. शहर परिसरात अलिकडील काळात दुचाकी चोरीचे प्रमाणही वाढले आहे.

# बनावट प्रमाणपत्र दाखवून निराधार योजनेचा लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली ज्येष्ठ नागरिकांची लूट...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

सिंदखेड राजा तालुक्यामधील ग्रामीण भागातील लोकांना तुम्हाला संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळवून देण्याकरिता व तुमच्या हक्काचा लाभ तुम्हाला घरपोच मिळावा कोणतेही कष्ट पडू नये याकरिता शासनाने आम्हाला आमच्या संस्थेला बुलढाणा जिल्ह्यातील हे काम दिले असून या संदर्भातील सर्व माहिती सबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून संजय गांधी निराधार योजनेच्या जिल्हा कार्यालयाकडून तहसीलदार तलाठी सर्व यांना दिल्यात देण्यात आल्या असून आम्ही तुम्हाला तुमच्या हक्काची ही योजना मिळवून देण्याकरिता प्रयत्न करू याचप्रमाणे तालुक्यामधील बरेच ग्रामपंचायत सरपंच व सचिव यांना भेटून संस्थेच्या कामाबद्दल माहिती देऊन आम्हाला सहकार्य करण्याबाबत सूचना दिल्या जातात त्याचप्रमाणे गावोगावी आपल्या एजंट मार्फत अशा लोकांना जमा करून त्यांच्याकडून कागदपत्रे व लागणाऱ्या खर्चाकरिता सहाशे ते हजार रुपये पर्यंत रक्कम वसूल करून फसवणूक होत असल्याची अनेक सुज्ञ नागरिकांच्या लक्षात आल्यामुळे याबाबत या संस्थेच्या महिलांना विचारपूस केली असता त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे तुम्ही याच्यात पडू नका आमचे काम आम्हाला करू द्या अशी समज सुद्धा काही लोकांना देण्यात आल्याचे बोलले जात आहे सविस्तर वृत्त असे की तालुक्यामधील दुसर बीड किनगाव राजा धानोरा या गावांमध्ये निराधार यांना निराधार ची पगार मिळवून देण्याकरिता आमच्या मार्फत कागदपत्रे जमा करून लागणारा खर्च आमच्याकडे द्या व आम्ही तुम्हाला तुमची पगार सुरू करून देऊ असे सांगून सर्वांना एकत्र करून हा शासनाकडून कॅम्प आहे यामध्ये तुमचे काम होईल असे सांगून कागदपत्रे जमा करून व लागणाऱ्या खर्चाची सहाशे रुपये ते १००० रुपये पर्यंत रक्कम जमा करून घेऊन फसवणुकीचा धंदा सर्रास सुरू असल्याची बोलले जात असून -वीर तानाजी मालुसरे बहुउद्देशीय संस्था साखळी या संस्थेच्या अध्यक्ष म्हणून सौ रेखा कैलास पोफळकर असे धर्मदाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी असलेली प्रमाणपत्र दाखविले जात असून २४. ११. २०20 रोजीचा शासनाकडून सर्व तहसीलदारांना वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जन्म तारखे गृहीत धरण्यात यावी असा एक आदेश पत्र दाखवून व या संस्थेला काम दिल्या बाबत जिल्हा संजय गांधी निराधार योजनेच्या पत्राचा दाखला दिला जात आहे अशी सर्व कागदपत्रे दाखवून लोकांची दिशाभूल करण्याचे काम सुरू आहे हे फार मोठे रॅकेट सक्रिय असल्याचे बरीच लोक बोलत असून या महिला गावोगावी जाऊन अशा प्रकारची निराधार योजनेची कॅम्प घेऊन लोकांची फसवणूक करत आहेत याबाबत संबंधित तह-सीलदार सिंदखेड राजा अनेक लोकांनी फोन द्वारे माहिती दिली असून कार्यालयाकडून कोणतीही आजपर्यंत कारवाईन झाल्याचे सांगण्यात येत आहे दुसर बीड येथील देवीच्या मंदिरावर अशाच प्रकारचा निर-ाधार योजनेच्या लाभार्थ्यांचा कॅम्प घेऊन त्यांची कागदपत्रे घेऊन व खर्च करता लागणारी पैसे घेऊन या लोकां ची दिशाभूल करण्याचा व फसवणूक करण्याचा प्रकार सुरू झाला आहे याबाबत तुम्ही कुणाला जास्त बोलल्यास तुमचे काम होणार नाही तुमचेच नुकसान होईल असे सूचना सुद्धा देण्याचे काम या महिला करतात या प्रकाराबाबत



सिंदखेड राजा तहसील चे तहसीलदार श्री सचिन जयस्वाल यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला असता आमच्याकडे शासनाकडून अशा प्रकारच्या कोणत्याही संस्थेला काम दिल्याचे सूचना वगैरे ना-हीत व जे घेण्यात येत असलेल्या कॅम्प बाबत यांचा कोणताही संबंध नाही आमच्याकडे असे लोक कोणते प्रकारचे अर्ज सुद्धा आणून देत नाही त्यांच्या भूलथापांना लोकांनी बळी पडू नये असे सांगण्यात आले या लोकांनी किनगाव राजा धानोरा व इतर गावांमध्ये जाऊन सुद्धा अशा प्रकारच्या योजना चा लोकांना आम्हीच देऊन लाख-ो रुपयांचा गंडा घातल्याचे सर्वत्र चर्चा असून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी याबाबत लक्ष घालून तोतया गीरीकरणाऱ्या ठगांचा बंदोबस्त करावा व होत असलेली फसवणूक व होत असलेली ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक थांबवण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे

## राज्यात स्थानिक स्वराज संस्थांमध्ये प्रशासकराज राज्याचे २२ हजार कोटी अडकले - पृथ्वीराज चव्हाण

**वृत्तसंस्था/ नागपूर**




महाराष्ट्रात पंचायत समितीपासून ते इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाराष्ट्रात मागील दोन वर्षांपासून झालेल्या नाहीत. त्यामुळे, केंद्र शासनाकडून राज्याला अपेक्षित असलेला २२ हजार कोटी रुपयांचा निधी अद्यापही मिळा-लेला नाही, अशी माहिती काँग्रेसचे आमदार पृथ्वीराज चव्हाण यांनी विधानसभेत दिली.

औचित्याचा मुद्दा उपस्थित करून चव्हाण यांनी महाराष्ट्राला सहन कराव्या लागत असलेल्या या आर्थिक नुकसानीकडे लक्ष वेधले. महाराष्ट्रात दोन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. सगळ्या संस्थांवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्र शासनाकडून राज्याला विविध योजनांतर्गत २२ हजार कोटी रुपयांचा निधी मिळू शकतो. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकनियुक्त प्रतिनिधी असणे ही त्यासाठीची प्राथमिक अट आहे.राज्यात अनेक ठिकाणी असे प्रतिनिधी नसल्याने हा प्रचंड निधी आपल्याला मिळू शकलेला नाही. ग्रामीण भागातही निवडणुका न झाल्याने त्यांनाही ८ हजार कोटी रुपये मिळू शकलेले नाही. यामुळे, महाराष्ट्राचे मोठे नुकसान होते आहे, असा मुद्दा चव्हाण यांनी मांडला. राज्य सरकारने केंद्र शासनाशी संपर्क साधून हा निधी मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे अशीही मागणी त्यांनी यावेळी सभागृहात केली.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ग्रामपंचायत ने दखल न घेतल्यामुळे अंत्री खेडेकर येथील विठ्ठल खेडेकर करणार ग्रामपंचायत भवन येथे आमरण उपोषण.

जनसंचलन/ चिखली

तालुक्यातील मौजे अंत्रीखेडेकर येथे स्मशानभूमी कडे जाणारा रस्ता बंद झाला आहे त्या वर अतिक्रमण झालेले आहे त्या साठी अंत्रीखेडेकर येथील विठ्ठल नारायण खेडेकर व इतर यांनी ग्रामपंचायत कार्यालय अंत्री खेडेकर यांच्या कडे रितसर तक्रार दाखल केली होती परंतु ग्रामपंचायत कार्यालय अंत्रीखेडेकर यांना कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही त्यामुळे विठ्ठल खेडेकर यांनी त्या तक्रारीचे मेल महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार दाखल केली होती परंतु ग्रामपंचायत अंत्री खेडेकर यांनी कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्यामुळे अखेर १८ /१२ /२०२३ रोजी अंत्री खेडेकर येथील विठ्ठल नारायण खेडेकर यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब व ग्रामपंचायत कार्यालय अंत्री खेडेकर यांना एका ईमेल द्वारे अंत्रीखेडेकर ग्रामपंचायत भवन येथे २६/१२/२०२३रोजी आमरण उपोषणाची तक्रार दाखल केली आहे तिची दखल घेऊन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी ईमेल ची दखल घेऊन पुढील कारवाईसाठी प्रधान सचिव ग्रामविकास व पंचायत राज यांच्याकडे प्रकरण वर्ग केले आहे अंत्री खेडेकर येथील स्मशान भूमी रोड प्राथमिक आरोग्य केंद्र इथून स्मशानभूमीकडे जाणार आहे त्यावर झाडे झुडपे व इतर अडचणी आहे त्यामुळे हा रस्ता कित्येक दिवसापासून बंद आहे या रोडवर शासनाने लाख रुपये या अगोदर सुद्धा खर्च केले आहे परंतु हा रस्ता रहदारी साठी बंद पडलेला आहे त्यामुळे अंत्री खेडेकर येथील विठ्ठल नारायण खेडेकर तक्रार दाखल केली आहे व २६जानेवारी २०२३ रोजी ग्रामपंचायत कार्यालय अंत्री खेडेकर येथे आमरण उपोषणाला बसणार आहेत

# रविंद्र वाघ यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकारिता पुरस्कार जाहीर...

जनसंचलन/बुलढाणा



साप्ताहिक अखंड झेप चे मुख्य संपादक तथा असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्युजपेपर्स ऑफ इंडिया बुलढाणा जिल्हाध्यक्ष रविंद्र वाघ यांना मातोश्री वच्छलाबाई गवई शैक्षणिक संस्था साखरखेर्डा यांच्याकडुन सर्व श्रेष्ठ समजला जाणारा मानाचा पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकारिता पुरस्कार जाहिर झाला आहे.

पत्रकार रविंद्र वाघ यांनी आपला प्रवास सामाजिक कार्यापासून ते पत्रकार क्षेत्रात मध्ये दैनिक सायरन, बिग न्युज टिव्ही नेटवर्क ते दैनिक विश्व जगत गेल्या १८ वर्षापासून पत्रकार क्षेत्रात उपेक्षित वर्गातील लोकांना सामाजिक व पत्रकारिता क्षेत्राच्या माध्यमातून न्याय देण्याचा प्रयत्न करत आहेत, यापुढेही शेतकरी, शेतमजूर कष्टकरी सामाजिक लिखाण करून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न ठेवल्याबद्दल सदर पुरस्कार ३० डिसेंबर २०२३ रोजी एका शानदार समारंभामध्ये प्रधान करण्यात येणार आहे.

# गौणखनिज वाहतूक करणारे २ ट्रॅक्टरवर २ लाख ४४ हजार रु. दंड आकारला...

जनसंचलन / लोणार

शहरातील बसस्थानक चौकातून अवैधरीत्या गौणखनिजाची वाहतूक करणाऱ्या २ ट्रॅक्टर तहसीलदार गिरीष जोशी यांनी दंडात्मक कारवाईसाठी ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन आवारात लावल्याची घटना १७ डिसेंबर रोजी घडली. शासनाचा महसूल बुडवून अवैधरीत्या रेती, मुरूम वाहतूक सूरु असल्याची माहीती तहसिलदार गिरीष जोशी यांना मिळताच एम.एच.२१ बिक्यू ०३७१ व एम.एच.३७ ईएफ ३७६५ क्रमांकाची अवैधरीत्या गौण खणीज वाहतूक करणारी २ ट्रॅक्टर दंडात्मक कारवाईसाठी ताब्यात घेऊन २ लाख ४४ हजार रुपायाचा दंड आकारण्यात आला. तसेच मराठवाड्यातून महसूलच्या नजरा चूकवून अवैधरीत्या रेती वाहतूकीला पायबंध घालण्यासाठी ६ तपासणी चौक्या लावण्यात येणार असल्याची माहीती तहसीलदार गिरीष जोशी यांनी दिली.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या संपामुळे कामे खोळंबली...

जनसंचलन / मेहकर

ग्रामपंचायतीचा कारभार हाकणारे सरपंच, सदस्य, ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवक, ग्रामपंचायत कर्मचारी आणि संगणक परिचालक सोमवारपासून बेमुदत संपावर गेले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील विविध कामे ठप्प झाली आहेत. ग्रामपंचायतीशी निगडीत विविध महत्वपूर्ण घटक संपावर गेल्यामुळे ग्रामीण भागातील विविध कामे ठप्प पडली आहेत. या आंदोलनात अखिल भारतीय सरपंच परिषद, ग्रामसेवक युनियन डीएनई १३६, महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघ १३७०, ग्रामरोजगार सेवक संघटना महाराष्ट्र राज्य एनजीपी ५७७५, महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटना, ग्रामपंचायत कर्मचारी कामगार सेना, महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत व जिल्हा परिषद कामगार संघटना, महाराष्ट्र राज्य ग्राम रोजगार सेवक संघटना ५१०२, महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी ग्रामपंचायत कर्मचारी संघटना पीएन ५१३९ आदी संघटनाचे पदाधिकारी आणि सदस्य सहभागी झाले आहेत. ग्रामपंचायतीच्या संदर्भात काही मागण्या असून ग्रामपंचायती आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी उत्पन्न वाढीसाठी व करवाढीसाठी ग्रामविकास विभागाने निर्णय घ्यावेत या मागण्यांमध्ये आमदार निधीप्रमाणे ग्रामपंचायत सदस्यांना वार्डाच्या विकासासाठी सदस्य निधी असावा, ग्रामपंचायत सदस्य भत्ता व सरपंच, उपसरपंच मानधन थकीत बाकी तात्काळ अदा करण्यात यावी, मानधनात वाढ करण्यात यावी, सदस्यांना विमा संरक्षण देण्यात यावे, यासह विविध मागण्यांसाठी कर्मचारी संपावर गेले आहेत.

# वधूवर परिचय संमेलन ही बदलत्या काळाची गरज-प्रा.सदानंद माळी

## सकल माळी समाज नांदुरा मलकापूर तालुक्याच्या वतीने राज्यस्तरीय उपवर युवकयुवती परिचय महासंमेलन संपन्न

जनसंचलन/ नांदुरा

सकल माळी समाज नांदुरा व मलकापूर तालुक्याच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय उपवर युवक परिचय महासंमेलन कोठारी हायस्कूल नांदुरा, येथे अतिशय उत्साहात यशस्वीपणे १७ डिसेंबर २०२३ रोजी संपन्न झाले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष सदानंद माळी सर (शिवसेना नेते , बुलढाणा) हे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून माननीय श्री कृष्णरावजी इंगळे साहेब(माजी आमदार जळगाव जामोद), माननीय श्री बळीरामजी शिरस्कार साहेब (माजी आमदार बाळापूर), माननीय श्री प्रकाशजी तायडे साहेब(सचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी तथा संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र माळी युवक संघटना), माननीय सौ ज्योतीताई ढोकणे (महिला प्रदेश अध्यक्षा राष्ट्रीय ओबीसी महासंघ ) ,माननीय सौ . शालिनीताई बुंदे (जेष्ठ भाजपा नेत्या) ,माननीय श्री प्रकाशजी ढोकणे ( सहकार नेते ) तसेच श्रीमती सुमनताई महादेवराव गवळी (जेष्ठ समाजसेविका )तसेच महासम्मेलनाचे अध्यक्ष माननीय श्री सुभाष महादेवराव गवळी , कार्याध्यक्ष मा .श्री . सुभाषराव बावस्कार ( मलकापूर ) यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होते .याप्रसंगी सर्व मान्यवरांनी युवक युवती परिचय सम्मेलनाची पुस्तिका स्नेहबंध चे विमोचन करुन शुभेच्छा दिल्या .या प्रसंगी माननीय श्री लालाभाऊ इंगळे (शिवसेना नेते ) , मा .श्री . गणेशभाऊ भोपळे ( माजी सभापती, मा .श्री . अनिलभाऊ इंगळे ( माजी सभापती पं.स. नांदुरा ) , मा . श्री . गजाननराव चरखे ( मा .सभापती पं .स नादुरा ) , मा श्री . अमृतराव बोबंटकार ( जेष्ठ भाजपा नेते ) मा . श्री .संजयजी घाटे (संचालक नांदुरा अर्बन बँक ) , मा . श्री . रामदासजी सपकाळ ( उपाध्यक्ष , श्री . संत सावता माळी पंचमंडळ नांदुरा ) , मा .श्री . गजाननजी बावस्कार सर (जेष्ठ कांग्रेस नेते ) , श्यामभाऊ राखोंडे (जेष्ठ भाजपा नेते ) ब्रम्हानंदभाऊ चौधरी (भाजपा नेते ), मा . डॉ . भास्करराव चरखे साहेब ( अध्यक्ष ,शेगाव उपवर युवक युवती परिचय संमेलन ) मा .श्री . गोपाळराव तायडे (जिल्हा अध्यक्ष संत सावता माळी संघटन ) मा सौ . सरिताताई बावस्कार यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती . या उपवर युवक युवती परिचय महासंमेलनात ७०१ उपवर युवक युवतींनी आपला परिचय दिला . संमेलन यशस्वी करण्यासाठी सम्मेलनाचे अध्यक्ष श्री सुभाष महादेवराव गवळी, कार्य अध्यक्ष श्री सुभाषराव पांडुरंग बावस्कार ,सचिव श्री . नितिन सातव सर ,सहसचिव श्री . वासुदेव घाटे सर , उपाध्यक्ष -श्री विजय भोपळे , संजय देवकर , श्री . कैलास माळी , श्री . कैलास वानखडे , कोषाध्यक्ष श्री . गजाननराव वानखडे सर , सहकोषाध्यक्ष श्री .भारत बंड सर , संघटक श्री . रविंद्र खंडारे , सहसंघटक राजूभाऊ कळस्कार , समन्वयक श्री . संतोषराव घाटे , तुकाराम खंडारे , दत्ताभाऊ जुमडे , सर्वश्री निवृत्ती घोगले सर , रामेश्वर वेरुळकार सर , शालीग्राम



राऊतसर , बाळकृष्ण तायडे सर , गजानन वेरुळकार , दिपक वानखडे सर ,प्रशांत चोपडे सर ,भागवत खंडारे सर, विलास इंगळे सर , प्रविण सातव सर , अनिल इंगळे सर , गजानन भुसारी सर , रविंद्र तायडे सर ,ॲड .पि.एम वानखडे साहेब सर , संतोष सातव सर ,निनाजी तायडे सर , सोनूभाऊ चोपडे ,विशाल भोपळे , सुनिल सपकाळ , नंदू जुमडे , दिनेश राऊत , सागर वावटळीकर , गणेश राखोंडे , प्रफुल निखाडे , अमित सातव , विनायक वाकेकर , चेतन सातव , युवा चित्रकार माधव वानखडे , रांगोळीकार पप्पु तायडे ,निखील देशमुख ,पुरुषोत्तम डवंगे , प्रथमेश तायडे तसेच महिला प्रतिनिधी सौ .नंदाताई गवळी , सुनंदाताई वानखडे , सौ . अश्विनी सातव , सौ . अनिताताई चौधरी , सौ . मिराताई चोपडे तसेच सर्व समाज बांधवांनी सहकार्य केले . कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मा .सौ . प्रतिभाताई भोपळे आणि प्रा. श्री . नितीन भुजबळ सर यांनी केले .

# संसदेत खासदारांच्या निलंबनाचा सपाटा सुरुच; सुप्रिया सुळे, अमोल कोल्हेंसह आणखी ४९ खासदारांवर कारवाई



वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

संसदेतील सुरक्षायंत्रणा भेदण्याच्या मुद्द्या-वरुन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सदेत येऊन निवेदन करावे, या मागणीसाठी आज सलग दुसऱ्या दिवशी लोकसभेत विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतला. त्यामुळे मंगळव-ारी लोकसभेत पुन्हा एकदा खासदारांवर घाऊक पद्धतीने निलंबनाची कारवाई झाली. लोकसभेतील ४९ खासदारांना आज निलंबित करण्यात आले. केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघ-वाल यांनी खासदारांच्या निलंबनाचा प्रस्ताव लोकसभेत मांडला आणि तो मंजूर झाला. निलंबित झालेल्या खासदारांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे आणि अमोल कोल्हे यांचा समावेश आहे. याशिवाय, मनिष तिव-ारी, शशी थरुर, एमडी फैसल, कार्ती चिदंबरम, सुदीप बंडोपाध्याय आणि डिंपल यादव आणि दानिश अली यांचाही समावेश आहे. लोकसभा आणि राज्यसभेतून सोमवारी विरोधी पक्षांच्या तब्बल ७८ खासदारांना अधिवेशनकाळासाठी निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर आज लोकसभेच्या आणखी ४९ खासदारांचे निलंबन करण्यात आले. एकाच अधिवेशनात विरोधी पक्षांच्या खासदारांना एवढ्या मोठ्या संख्येने संसदेबाहेरचा रस्ता दाखवण्याचा देशाच्या संसदीय इतिहासातील हा पहिलाच प्रसंग असल्याचे जाणकार सांगतात. --विरोधकमुक्त संसदफ ही गेल्या साडेनऊ वर्षातील अंतस्थ इच्छा मोदी सरकारने अखेर प्रत्यक्षात आणल्याचे टीकास्त्र विरोधी नेत्यांनी सोडले आहे.या सगळ्या प्रकारानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. लोकशाहीच्या मार्गानं आम्ही निवडून आलोय. पण दडपशाही सुरु झाली. आतापर्यंत १०० पेक्षा जास्त खासदार निलंबीत झाले आहेत, संसदेत हल्ला झाला, त्यासंदर्भात आम्ही चर्चेची मागणी केली. पण प्रश्न विच-ारणे बाहेर आहेत. सत्ताधाऱ्यांना विरोधक नको आहेत, त्यामुळे निलबनांची कारवाई करण्यात आली. आमचं सरकार होतं, त्यावेळी आम्ही कधीचं असं केले नाही. देशाच्या गृहमंत्र्यांनी येऊन संसदेत झालेल्या हल्ल्यासंदर्भात निव-ेदन द्यावे, त्यावर चर्चा व्हायला हवी आहे. पण सरकारला चर्चा करायची नाही, दडपशाही सुरू आहे, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले.

# इंडिया आघाडीने लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान मोदींना टक्कर देणारा चेहरा निवडला?

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

इंडिया आघाडीने लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान मोदींना टक्कर देणारा चेहरा निवडला? खर्गे यांचे नाव रिंगणात आगामी लोकसभा निवडणुकीसाठी इंडिया आघाडीची रणनीती ठरविण्यासाठी दिल्लीत झालेल्या प्रमुख नेत्यांच्या बैठकीत विरो-धी आघाडीचे समन्वयक पर्यायाने संभाव्य पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे नाव सुचवण्यात आले. तृणमूल काँग्रेससह इतर काही पक्षांनी ३१ डिसेंबरपर्यंत जागावाटपाबाबत ठोस निर्णय घेण्याची मागणी केल्याचेही सूत्रांचे म्हणणे आहे. इंडिया आघाडीच्या बैठकीला काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उद्धव व आदित्य ठाकरे, पीडीपीच्या मेहबूबा मुफ्ती, तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी, द्रमुकचे एम. के. स्टॅलिन, आपचे अरविंद केजरीवाल आणि भगवंत मान, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार व सुप्रिया सुळे, राजद नेते लालूप्रसाद व तेजस्वी यादव, माकपचे सीताराम येचुरी, समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, नॅशनल कॉन्फरन्सचे फारुख अब्दुल्ला आदी २७ ते २८ पक्षांचे




नेते सहभागी झाले होते. आतापर्यंत पाटणा, बेंगळुरू आणि मुंबईनंतरची ही चौथी बैठक दिल्लीतील अशोका हॉटेलमध्ये झाली. तीन तास चाललेल्या या बैठकीत सर्व राज्यांमध्ये परस्पर सहकार्याने लोकसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.याच बैठकीत ममता बॅनर्जी आणि केजरीवाल यांनी इंडिया आघाडीचे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून खर्गे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवल्याचे समजते. ज्येष्ठ नेते टी. थिरुमावलावन यांनी हा गौप्यस्फोट केला. मात्र, खर्गे यांनी ही सूचना अमान्य केली. लोकसभा निवडणूक जिंकणे महत्त्वाचे आहे. पंतप्रधानपदाची चर्चा नंतर होईल. संसदेतून विरोधी पक्षांच्या शेकडो खासदारांना बाहेर काढले जात असताना देशातील लोकशाही वाचवण्यासाठी इंडिया आघाडीला लोकसभा निवडणूक भक्कमकपणे लढावी लागणार आहे, अशी भूमिका खर्गे यांनी मांडली. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, पंजाब आणि दिल्ली या राज्यांमध्ये इंडिया आघाडीतील जागावाटपाचा पेच निर्माण होण्याची चिन्हे आहेत. मात्र, हा मुद्दा लवकरच सुटेल, असा आघाडीच्या नेत्यांना विश्व-ास आहे. लोकसभेतील विजयाची चावी मानल्या जाणाऱ्या उत्तर प्रदे-शात समाजवादी पक्ष आणि काँग्रेस यांच्यात फॉर्म्युला २१फ वापरला जाऊ शकतो असे सूत्रांचे म्हणणे आहे. येथे जवळपास २१ जागा अशा आहेत, ज्या समाजवादी पक्ष कधीही निवडणूक जिंकलेला नाही. अखिलेश यादव या २१ जागा काँग्रेस व इतर पक्षांसाठी सोडू शकतात.

# मेहकर तालुक्यातील दुधा,येथील घरावर सशस्त्र दरोडा, ४ लाखाचा मुद्देमाल लंपास

जनसंचलन/हिवरा आश्रम

मेहकर तालुक्यातील हिवरा आश्रम जवळ असलेल्या दुधा येथे दि १७ डिसेंबरच्या मध्यरात्री २ ते ४ च्या सुमारास चार ते पाच दरोडेखोरांनी प्रेमकुमार रामराव सास्ते यांच्या घराच्या मागील गेटचे कुलुप तोडून घरामध्ये प्रवेश करून घरातील ८ तोळे सोने आणि नगदी ४० हजार रूपये असा लाखो रूपयांचा मुद्देमाल चोरून चोरट्यांनी पोबारा केल्याची घटना घडली. या घटनेमुळे दुधा गावासह हिवरा आश्रम परिसरात मोठी खळबळ ऊडाली असून दहशत पसरली आहे. या घटनेमुळे पोलीसांसमोर दरोडेखोरांना पकडण्याचे आव्ह-ान ऊभे ठाकले आहे. यादरम्यान चोरट्यांनी रामेश्वर सास्ते यांच्या घराचा कडी कोंडा तोडला असता घरात झोपलेल्या त्यांच्या पत्न-ीला आवाज आल्याने त्या झोपेतून जागी झाल्यामुळे दरोडेखोर पळून गेले. प्रेमकुमार रामराव सास्ते यांच्या घराच्या मागील गेटची कडी तोडून घरात प्रवेश करून घरातील कपाटातील ८ तोळे सोने आणि नगदी ४० हजार रूपये असा एकुण ४ लाख १५ हजार रूपयाचा मुद्देमाल लंपास केला. या घटनेची माहिती जानेफळ पोलीसांना कळताच ठाणेदार मानकर यांनी तात्काळ सहका-यांसह दुधा येथे भेट दिली, आणि बुलडाणा येथील श्वान पथक आणि ठसेतज्ञ यांचा पा-चारण केले. पण श्वान पेनटाकळीच्या कॅनॉल पर्यंतच येऊन थांबले. या घटनेची तक्रार प्रेमकुमार सास्ते यांनी जानेफळ पोलीस स्टेशनला दिली. दरोडेखोरांनी प्रेमकुमार सास्ते सह त्यांच्या घरातील सदस्य झोपलेले असतांना गुंगीचा फवारा फवारून बेशुध्द केले, त्यांनतर रामेश्वर सास-्ते हे शेतातून पिकाला पाणी देऊन घरी आले असता त्यांना घराचा कडी कोंडा तुटलेला दिसला, तर प्रेमकुमार सास्ते यांनी याबाबत गाव-ातील लोकांना फोन करून गावामध्ये चोर आले असल्याची माहिती देऊन सावध रहा असे सांगीतले. या घटनेमध्ये प्रेमकुमार सास्ते यांच्या कपाटातील सोन्याचा चपटा तिन पदरी हार ३५ ग्रॅम, किंमत १ लाख ७५ हजार रूपये, २ सोन्याची सौभाग्य पोथ २७ ग्रॅम किंमत १ लाख १५ हजार रूपये, २ सोन्याचे झुंबर ८ ग्रॅम किंमत ४० हजार रूपये, २ सोन्याच्या बदामी अंगठ्या ९ ग्रॅम किंमत ४५ हजार रूपये आणि नगदी ४० हजार रूपये असा एकून ४ लाख १५ हजार रूपये चोरून नेला. या प्रकरणी जानेफळ पोलीसांनी कलम ४५७, ३८० भादवी नुसार अज्ञात दरोडेखोरा विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. सदर या घटनेचा तपास ठाणेदार मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमदार हुसेन पटेल हे करीत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याला वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी

| Size | Rates | Height | Width |
|---|---|---|---|
| 8x8 cm | 1 Month=5000/- 15 Day=3500/- 7 Day=2000/- | Hight 8 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/- 15 Day=2200/- 7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 1 Month=3500/- 15 Day=2200/- 7 Day=1500/- | Hight 5 cm | Width 23 cm |

एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्‌घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.

One Day
Full Page= 8000/-
1/2 Page= 5000/-

| Rate | Height | Width |
|---|---|---|
| 2600/- | Hight 12 cm | Width 12 cm |
| 1800/- | Hight 8 cm | Width 10 cm |
| 1300/- | Hight 8 cm | Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:

अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com